<u>प्रेस नोट दि.२८/०१/२०१७</u>

उत्तमनगर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं ४/२०१७ भादवि कलम ३०२,३४ मधील १० ते १२ दिवसांपासून पाहिजे असलेला आरोपी शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या ताब्यात.

आज दि.२८/०१/२०१७ रोजी पोलीस उप निरीक्षक एस.एस.काळे, पो.शि.९८१३ शेख, पो.शि.८७८० जगताप, पो.शि.८६०४ शिरकांडे, पो.शि.१००९४ गाडेकर असे पुणे महानगरपालिकेच्या निवडणूकीच्या अनुषंगाने शिवाजीनगर पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये पेट्रोलिंग करीत असतांना पो.शि.९८१३ शेख यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुमारे १० ते १२ दिवसांपूर्वी उत्तमनगर पोलीस ठाणे येथे दाखल झालेल्या खुनाचे गुन्हयातील आरोपी हा शिवाजीनगर एस.टी.स्टॅन्ड येथून बाहेरगावी जाणेच्या तयारीत असून तो तेथे कोणाचीतरी वाट पाहत नाशिककडे जाणा-या एस.टी.स्टॅन्ड येथे बसलेला आहे. त्याचे अंगावर पांढ-या रंगाचा नक्षी असलेला शर्ट व क्रिम रंगाची कारगो पॅन्ट घातलेली आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने वरील नमूद स्टाफने शिवाजीनगर एस.टी.स्टॅन्ड येथे जाऊन एस.टी.स्टॅन्ड मधील नाशिककडे एस.टी. स्टॅन्ड येथे जाऊन पाहणी केली असता बातमीदारामार्फत मिळालेल्या वर्णनाचा कपडे घातलेला मुलगा तेथे बसलेला असल्याचे दिसून आल्याने त्यास स्टाफचे मदतीने १३.३० वाजता ताब्यात घेऊन त्याचेकडे केलेल्या चौकशीत त्याने सुमारे १० ते १२ दिवसांपूर्वी उत्तमनगर येथे झालेल्या खुनाचे गुन्हयामध्ये सहभाग असल्याचे सांगून मी तेव्हापासून पळून गेलेलो असल्याचे सांगितले. त्याबाबत उत्तमनगर पोलीस ठाणे येथे अधिक खात्री केली असता त्याबाबत उत्तमनगर पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं.४/२०१७ भादवि कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हया दाखल असल्याची माहिती मिळाल्याने ताब्यात घेण्यात आलेला खालील नमूद आरोपी यांस पुढील कारवाई करीता उत्तमनगर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

**अमन कलीम खान, रा. उत्तमनगर पोलीस चौकी मागे उत्तमनगर पुणे.**

वरील नमूद कारवाई ही मा.अपर पोलीस आयुक्त सो दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.पोलीस उपआयुक्त सो, परिमंडळ-१ पुणे शहर, मा.सहा.पोलीस आयुक्त सो, विश्रामबाग विभाग पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री.राजेन्द मोकाशी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पो स्टे पुणे यांचे दिमतीत तपास पथकाचे पोलीस उप निरीक्षक सागर काळे, पो.शि.समिर शेख, विजयकुमार जगताप, अशोक शिरकांडे, अमोल गाडेकर यांनी केलेली आहे.